नि.दि. दावा क्र.११३/२०१२
मंगलाबाई....विरुद्ध....तुकाराम

# निशाणी क्रमांक ५ वरील आदेश

(दिनांक ३०/०९/२०१३)

१. वादींनी मौजे डोंगरगाव दाभाडी, ता. बदनापूर, जि. जालना येथील गट क्रमांक १८, ३०, ५८ व २६६ या (यास यापुढे संक्षितपणे वादग्रस्त जमीन असे संबोधीले आहे) जमीनि प्रतिवादींनी कोणास विक्री अथवा हस्तांतरीत करु नये म्हणून तात्पुरता मनाई हुकूम मिळणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथन संक्षिप्त येणेप्रमाणे :

प्रतिवादी क्र.१ हा वादी क्र.१ सासरा असून वादी क्र.२ चा आजोबा आहे. वादी क्र.२ हा प्रतिवादी क्र.१ चा मोठा मुलगा असून प्रतिवादी क्र.३ ही वादी क्र.१ ची सासु आहे व प्रतिवादी क्र.४ ते ६ हया ननंदा आहेत. वादी क्र.१ चे पती राजेन्द्र यांचा दिनांक १४/०४/२००३ रोजी मृत्य झाला. त्यानंतर प्रतिवादी यांनी वादी हिस त्रास देण्यास सुरूवात केली व तिस मुलीसह माहेरी हाकलुन दिले. वादीने पुढे कथन केले आहे की, वादग्रस्त जमीनी या वादी, प्रतिवादींच्या हिंदु एकत्र कुटुबांची मालमत्ता असून त्यामध्ये वाटण्या झालेल्या नाहीत. वादी हे हाल अपेष्टेचे जीवन

जगत असून त्यांना कोणताही आर्थिक सहारा नाही. प्रतिवादी क्र.१ हा राजस्व विभागातील नोंदीचा गैरफायदा घेवून कोणत्याही क्षणी वादग्रस्त जमीनीचा विक्री करू शकतो त्यामुळे प्रतिवादीने जमीनीची विक्री केल्यास वादींना कायदेशीर हक्कापासून वंचित व्हावे लागेल म्हणून प्रतिवादींविरूध्द तात्पुरता मनाई हुकुम देण्याची विंनती वादींनी केली आहे.

३ प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी दाव्यात हजर होऊन त्यांची लेखी कैफीयत व म्हणणे नि.१८ वर दाखल केले आहे. त्यांनी वादीशी असलेले नातेसंबंध मान्य केले आहेत परंतु इतर कथने स्पष्टपणे अमान्य केली आहेत. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार मयत राजेंद्र याच्या हयातीत अलिखीत स्वरूपात वाटण्या झाल्या आहेत व वादी याच्या हक्काची मिळकत त्यांना मिळाली आहे. वादी यांच्या नावे असलेली स्थावर मालमत्ता वादीने अभिलेखावर आणलेली नाही. तसेच वादी क्र.१ ही राजेन्द्र सोबत लग्न झाल्यानंतर फक्त १५ दिवस सासरी राहिली व त्यानंतर ती प्रतिवादींकडे राहिली नाही. तसेच तिचा पती राजेन्द्र हा गंभीर आजारी असतांना त्यास सोडून ती स्वत: माहेरी निघून गेली आहे. त्यामुळे राजेन्द्र हा प्रतिवादीकडे आला व प्रतिवादींनी वादीचे आई वडील व नातेवाईकांना बोलावून घेवून सर्वांच्या संमतीने राजेन्द्रने त्याच्या हिस्स्याची जमीन वादीस दिली. त्यामुळे वादग्रस्त जमीनीशी वादींचा आता काही एक संबंध राहिलेला नाही.

निव्वळ प्रतिवादींना त्रास देण्याठी बनावट व खोटा दावा व प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे त्यामुळे तो फेटाळण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

४ वादीचे विधीज्ञ श्री एस.आर. मोगल यांनी लेखी युक्तीवाद नि. क्र.२२ वर दाखल केला, तर प्रतिवादीचे विधीज्ञ श्री एस.के. राजपूत यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज व त्यावरील म्हणणे/लेखी कैफियतीवरुन खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह विवेचन करीत आहे.

| अ. क्र | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १) | वादींनी त्याच्या अर्जातील कथने सकृतदर्शनी सिद्ध केले आहे काय ? | ..... | नकारार्थी |
| २) | अनुकूलतेचा कल अर्जदार/वादीच्या बाजूने झुकत असल्याचे अर्जदार सिद्ध करतात काय ? | ..... | नकारार्थी |
| ३) | मनाई हुकूम मिळाला नाही तर अर्जदारांचे अपरिमित नुकसान होईल हे अर्जदार सिद्ध करता काय ? | ..... | नकारार्थी |
| ४) | आदेश काय ? | ..... | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

६ वादींनी त्याच्या कथनाच्या समर्थनार्थ वादग्रस्त जमीनीचा प्रतिवादी क्र.१ च्या नावे असलेल्या एकुण जमीनीच्या दाखल्याची प्रमाणीत

प्रत तसेच मौजे डोंगरगाव दाभाडी येथील गट क्र.२६६, ५८, ३०, १८ या जमीनीचे साल २०११–१२ च्या ७/१२ उता–याच्या प्रमाणीत प्रती तसेच फेरफार क्र.१६ ची प्रमाणीत प्रत कागदपत्रांची सूची नि.क्र.४ अन्वये दाखल केले व वादी क्र.१ चे शपथपत्र नि.क्र.६ वर दाखल केले आहे. तर प्रतिवादी तर्फे प्रतिवादी क्र.२ चे शपथपत्र नि.क्र.२० व्यतिरीक्त काही एक कागदपत्रे दाखल केलेले नाहीत.

७ **मुद्दा क्रमांक १ ते ३ :**

मुद्दे क्रमांक १ ते ३ एकमेकांशी निगडीत असल्याने चर्चेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी चर्चेस्तव एकत्र घेतली आहेत.

वादी व प्रतिवादी यांची परस्पर विरोधी कथने पाहता वादग्रस्त जमीनी या वादी व प्रतिवादी तसेच वादीने दाखल केलेला फेरफार क्र.१६ चे अवलोकन केले असता पुर्वीचे कब्जेदार गोविंदा पुंजाजी याच्या मृत्यूनंतर त्याचे वारस पत्नी, भाऊ, मुले, मुली यांच्या नावाने दिनांक ०७/०६/१९८० रोजी मंजूर झाल्याचे दिसून येते. अभिलेखावर दाखल राजस्व विभागाचे कागदपत्रे यावरून वादग्रस्त जमीनी या वादी व प्रतिवादींच्या वडीलोपार्जित जमीनी असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. प्रतिवादीने वादी सोबत असलेले नातेसंबंध मान्य केले आहेत त्यामुळे हिंदू वारसा हक्क कायदयाच्या प्रचलित तत्वानुसार वादी क्र.१ व २ हे मयत

राजेन्द्र याचे कायदेशीर वारस असून त्यांचे वादग्रस्त जमीनीमध्ये हितसंबंध असल्याचे दिसून येते.

८ प्रतिवादींनी वादग्रस्त जमीनीच्या पुर्वीच वाटण्या झाल्या होत्या असे कथन केल आहे परंतु वादी व प्रतिवादींच्या एकत्र कुटुबांच्या मिळकतीच्या वाटण्या झाल्या अथवा नाहीत या मृद्यावर आजमितीस विचार करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे सदर मिळकती या वादी व प्रतिवादींच्या एकत्र कुटुंबांच्या मिळकती असल्याचे सकृतदर्शनी अभिलेखावर आल्याचे आढळते. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी हे वादग्रस्त मिळकतीचे हस्तांतरण करीत आहेत त्यामुळे त्यांच्या विरूध्द तातपुरता मनाई हुकुम आदेश पारीत करण्यात यावा असे म्हटले आहे. परंतु सदर हस्तांतरण होत आहे याबाबत वादीच्या निव्वळ तोंडी कथनाव्यतिरीक्त काही एक बाबी वादीने अभिलेखावर आणलेल्या नाहीत. तसेच महत्वाचे म्हणजे हिंदू वारसा कायदयाच्या प्रस्थापीत तत्वानुसार एक सहदायद दुस—या सहकायदा विरूध्द वाटण्या होईपर्यत मनाई हुकुम मागू शकत नाही त्यामुळे या बाबीवरही वादीचे कथन स्विकार्य नसल्याचे दिसून येते.

९ एकंदरीत वादीने मालमत्ता हस्तांतरण कायदा कलम ५२ अन्वये प्रकरण प्रलंबीत असतांना झालेल्या मालमत्ता हस्तांतरणाच्या बाबतीत दिलेले संरक्षण अपूरे असून दाव्यातील परिस्थीती पाहता दिवाणी प्रक्रीय संहिता आदेश ३९ नियम १ अन्वये त्यांनी तात्पूरता मनाई हकुम

देणे उचित ठरेल असे दर्शविणा—या काही एक बाबी अभिलेखावर आलेल्या नाहीत. त्यामुळे हिंदू वारसा कायदयाचे प्रस्थापीत तत्व व प्रकरणातील एकंदरीत परिस्थिती पाहता वादी ही तात्पूरता मनाई हुकुम मिळण्यास हक्कदार नसल्याचे आढळते त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे व खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. निशाणी क्रमांक ५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचे खर्चाचा विचार अंतिम न्यायनिर्णयाचे वेळी करण्यात येईल.

(सदर आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

स्वाक्षरीत

दिनांक : ३०.०९.२०१३

(एम. एस. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधिश (क.स्तर),
बदनापूर